## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्याचा विचार ह्या लघुप्रबंधात केलेला आहे.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातून कोकणातील ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. त्यांची "इंधन" ही कादंबरी मराठीतील चांगल्या दर्जाची प्रादेशिक कादंबरी आहे. त्यामुळे त्यांचे कथात्मक साहित्य समजावून घेण्यासाठी ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याचा विचार पहिल्या प्रकरणात केलेला आहे.

ग्रामीण साहित्यातील ग्रामीण हे विशेषण वर्णनात्मक असून ते केवळ अभ्यासाच्या सोयीसाठी वापरले जाते. भारतामध्ये ग्रामीण नागर भेद केला जातो. भारतातील तीन चतुर्थांश समाज खेड्यात राहतो. हा समाज सांस्कृतिक दृष्टया भिन्न अशा पातळ्यावर राहतो. शेतीप्रधान असणाऱ्या या देशातील ऐंशी टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. परंतु ग्रामीण नागर भेद लोकसंख्येवर करून चालणार नाही. तर या दोन्हीतील संस्कृतीमध्ये फरक असलेला पहावयास मिळतो. ग्रामीण संस्कृती स्थिर आहे. तिच्यामध्ये परिवर्तने मंदगतीने होतात. याउलट शहरी संस्कृती झपाट्याने बदलत असते. ग्रामीण साहित्य हे अस्सल ग्रामीण साहित्य होण्यासाठी ग्रामीण संवेदनशीलतेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणत्याही लेखकाच्या लेखनाला वैशिष्ट्य प्राप्त होते ते तो लेखक कोणत्या वातावरणात वाढला. त्याच्यावर कोणत्या समाजाचे संस्कार झाले यावर त्याच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण अवलंबून असते. लेखकाचे व्यक्तिमत्व कसे आहे यावर त्याची अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी ठरत असते. अनुभव

घेण्याच्या त्याच्या या क्षमतेला किंवा धाटणीला आपण लेखकाची संवेदनशीलता म्हणतो. जो लेखक ग्रामीण जीवनात वाढला असेल, ग्रामीण समाजाचे संस्कार त्याच्यावर झाले असतील, त्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला असेल तर त्याची संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता असते. अशा लेखकाचे ग्रामीण साहित्य हे अस्सल ग्रामीण साहित्य होते. जो लेखक शहरात वाढला असेल, ज्याने ग्रामीण जीवन जवळून पाहिले नसेल तर त्याचे ग्रामीण साहित्य हे अस्सल ग्रामीण साहित्य होणार नाही. तपशील देणा-या लेखकाचे साहित्य ग्रामीण साहित्य होईल. पण अस्सल ग्रामीण साहित्य होणार नाही. म्हणून अस्सल ग्रामीण व गुणवत्तेच्या दृष्टीने वरच्या दर्जाचे होण्यासाठी ग्रामीण साहित्य लिहिणा-या लेखका-जवळ ग्रामीण संवेदनशीलता असायला हवी.

ग्रामीण साहित्यात येणारे समाजजीवन हे शहरी समाजजीवनापेक्षा वेगळे आहे. भारतातील तीन चतुर्थांश समाज खेड्यामध्ये राहतो. त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. शेतक-यांना शेतीसाठी लागणारे साहित्य बारा बलुतेदार पुरवितात. शेतकरी त्याचा मोबदला म्हणून त्यांना आपल्या शेतात पिकलेले धान्य घालतो. अशा तऱ्हेने गावातील सर्व समाज एकमेकावर अवलंबून असतो.

ग्रामीण समाजात सामान्यत: संयुक्त कुटुंबपध्दती अस्तित्वात असते. या कुटुंबाची सर्व जबाबदारी कारभारी सांभाळीत असतो. पुरुषप्रधान असणाऱ्या या कुटुंबात स्त्रियांना दुय्यम स्थान असते.

ग्रामीण समाज श्रध्दाळू असतो. त्यांच्या जीवनात करणी, मांत्रिक, गंडे-दोरे यांना महत्व असते. ग्रामीण समाज परंपरेने घालून दिलेल्या चाको-या सहसा मोडीत नाही. ग्रामीण समाजात धर्म आणि परंपरा यांच्या विश्वा-तूनच अंधश्रध्दा निर्माण झालेल्या असतात.

आज मराठी साहित्यात प्रादेशिक या संज्ञेचा वापर केला जातो. प्रादेशिक साहित्यात एका विशिष्ट प्रदेशातील समाजजीवनाचे चित्रण आलेले असते. प्रादेशिक साहित्य आणि सामाजिकता यांचा घनिष्ट संबंध आहे. प्रादेशिक साहित्याच्या संकल्पनेत लोकमानसाचा समावेश झालेला असतो. सामाजिकतेशिवाय लोकमानस नीटपणे व्यक्त होत नाही आणि लोकमानसाशिवाय प्रादेशिकता निटपणे व्यक्त होत नाही. प्रादेशिक कादंबरीत समूहजीवन आणि सांस्कृतिक जीवन आलेले असते आणि हे चित्रित करण्यासाठी लेखकाला सामाजिकतेचा आधार घ्यावा लागतो. प्रादेशिक कादंबरीत वातावरण निर्मितीला अनन्यसाधारण महत्त्व असते. प्रादेशिक कादंबरी जिवंत व परिणामकारक होण्यासाठी तिच्यामध्ये स्थल आणि काल यातून जिवंत वातावरण निर्माण झाले पाहिजे. हे जिवंत वातावरण निर्माण करण्यासाठी लेखकाला सामाजिकतेचा आधार घ्यावा लागतो. प्रादेशिक कादंबरीत ज्या प्रदेशातील बोली भाषेचा वापर केलेला असतो. प्रादेशिक कादंबरीत येणाऱ्या बोलीभाषेतील शब्द, वाक्प्रचार म्हणी वैशिष्ट्येपूर्ण प्रादेशिक शब्दावली विशिष्ट अशा सामाजिक संकेतामधून निर्माण झालेले असतात. म्हणून प्रादेशिक साहित्याचा विचार करीत असताना तो सामाजिकतेच्या अंगाने केला पाहिजे. प्रादेशिक साहित्य जिवंत व परिणामकारक होण्यासाठी प्रादेशिक साहित्यात सामाजिकता आली पाहिजे.

आज ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य अशा वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या जातात. ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यामध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले असते. या दोन्हीमध्ये कृषिकेंद्रित समाजरचना, लोक-जीवन, लोकांच्या समस्या या बाबतीत साम्य आढळते. मात्र अधिक सूक्ष्मपणे पाहिल्यास त्या दोन्हीमध्ये फरकही आढळतो. प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण या संज्ञेपेक्षा अधिक व्यापक आहे. हा सर्वसामान्य स्वरूपाचा विचार हमीद दलवाईच्या कथात्मक साहित्याचे आकलन करण्यासाठी उपयुक्त ठरावा या हेतूने केला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील सामाजिकतेचा सविस्तरपणे विचार केलेला आहे.

हमीद दलवाई मुस्लिम समाजसुधारक आहेत. परंतु दलवाईंची समाज-पातळीवरील समाजसुधारक म्हणून भूमिका वेगळी आहे. तर साहित्यिक म्हणून वेगळी भूमिका आहे. त्यामुळे त्यांच्या कथात्मक साहित्यातून निखळपणे समाजजीवन अभिव्यक्त होते.

हमीद दलवाईंच्या "इंधन" या कादंबरीतील कथानक कोकणातील एका खेडेगावातील हिंदू, मुसलमान व बौध्द संघर्षावर आधारित आहे. गावामध्ये सर्व समाज सामुदायिक स्वरूपाचे जीवन जगत असतो. स्त्री-पुरुष संबंधातून गावामध्ये जातीय तणाव निर्माण होतो. सुरवातीचा संघर्ष भाऊ व कुळवाडी यांच्यामध्ये कुळवाड्यानी गवतात गुरे घातल्यामुळे होतो. या संघर्षाला खरे कारण भाऊ - सुमती संबंध हे असते. तर दुसरा संघर्ष इसाकने बौध्द समाजातील लक्ष्मीला घरी ठेवल्यामुळे इसाक व बौध्द यांच्यामध्ये होतो. व्यक्तिगत स्वरूपाचा असणारा संघर्ष जातीय रूप घेतो. तेथून पुढे जातीय तणाव वाढत जाऊन गावातील सर्व व्यवहार बंद होतात. धुमसत जाणाऱ्या संघर्षाला मशिदीवरून वाघ वाजविण्याचे तत्कालिन कारण मिळताच त्याचा स्फोट होतो. कोणत्याही जातीय संघर्षाचे स्वरूप सर्वसाधारणपणे असेच असते.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात कुटुंबव्यवस्थेचे चित्रण मोजकेच आलेले आहे. त्यांच्या कथात्मक साहित्यात विशेष करून मुस्लिम कुटुंबव्यवस्थेतील चालू पडामोडीचे वर्णन आलेले आहे. "इंधन" या कादंबरीमध्ये निवेदकाच्या कुटुंबाचे चित्रण सखोल असे आलेले आहे. या कुटुंबातील पिता-पुत्र, पति-पत्नी, दीर-भावजय व भावाभावामधील संबंध लेखकाने भावपूर्ण आणि विविधरंगी असे रंगविले आहेत. भावाभावाचे भांडण, त्यांचे पुन्हा बोलणे, वडिलांची आपल्या मुलांवर असणारी माया, सर्व कुटुंबाची काळजी घेणारी

भाबी हे सर्व वास्तव असे वाटते. निवेदकाच्या कुटुंबाबरोबरच सुमतीच्या कुटुंबाचे व वाण्याच्या कुटुंबाचे अल्प असे चित्रण "इंधन" या कादंबरीत आलेले आहे.

हमीद दलवाईच्या "छप्पर" व "खुदा हाफिज" या दोन कथांमधून मुस्लिम कुटुंबामधील दोन पिढ्यांतील असलेल्या विचारांमधील फरकाचे चित्रण आलेले आहे. "छप्पर" या कथेतील अब्बासखान व बानो अशिक्षित आहेत. आपल्या सुशिक्षित मुलाने क्षय हा रोग संसर्गजन्य आहे हे किती ही समजावून सांगितले तरी त्यांना पटत नाही. त्यांच्या अज्ञानीपणामुळे सर्व कुटुंब उध्वस्त होते. "खुदा हाफिज" या कथेतील मुस्लिम कुटुंब पूर्वी ऐशआरामात जीवन जगत होते पण बदललेल्या परिस्थितीमुळे सर्व दिमाख लयाला जातो. या कुटुंबातील तरुण सद्रुद्दीनवर त्याचा परिणाम होतो. तो पूर्वीचे वैभव मिळविण्यासाठी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न करतो. सरकारला ही बातमी मिळताच त्याला अटक होते. एकेकाळी वैभवात दिवस घालवणाऱ्या उबेदुल्ला आणि बानो या नवराबायकोवर म्हातारपणी अत्यंत वाईट परिस्थितीत दिवस काढण्याची पाळी येते "छप्पर" व "खुदा हाफिज" या दोन्ही कथेतील मुस्लिम कुटुंबव्यवस्थेच्या चित्रणातून दलवाईंनी मुस्लिम कुटुंबातील चालू पडझडीवर प्रकाश टाकलेला आहे. दलवाईंनी या दोन्हीही कुटुंबाची वेगवेगळ्या कारणाने शोकांतिका झालेली चित्रित केली आहे.

हमीद दलवाईच्या कथात्मक साहित्यात कोकणातील विशेष करुन मुसलमान समाजातील श्रध्दा, समजुती, परंपरा व संकेत याचे चित्रण आलेले आहे. "शेरणं" या कथेतील हसनखान रहीमखानच्या सल्यावरुन मूल होण्यासाठी गावच्या महालक्ष्मीला शेरणं घालतो. "तळपट" या कथेतील अण्णाचा मृत्यू हा खोटी शपथ दिल्यामुळे झाला अशी समजूत कासमखान बाळगतो. "महफिल" या कथेतील खतीजा अनैतिक संबंधातून गरोदर राहिल्यामुळे

तिथे मूल पाळले जाते. असा हा मुसलमान समाज हिंदू समाजाप्रमाणेच श्रध्दा, समजुती व परंपरेला चिकटून असलेला पहावयास मिळतो.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातून हिंदू, मुसलमान व बौध्द समाजातील दारिद्र्याचे चित्रण आलेले आहे. कोकणातील समाजाचे दारिद्र्य तर इतर प्रदेशातील समाजापेक्षा भयानक आहे. "इंधन" या कादंबरीतील जातीय संघर्षाच्या वेळी गावातील मुसलमान खोत चिडून बौध्द व कुणबी लो लोकांची कामे बंद करतो, त्यावेळी त्यांना चोरी करण्यासारखा मार्ग अवलंबावा लागतो. "कफनचोर" या कथेतील करीम कबरस्तानातील मृतदेहाच्या अंगावरील कपडे चोरून त्यावर आपली उपजीविका करतो. "बेकार (पण कलावंत) माणसाची गोष्ट" या कथेतील हमीदला नोकरीसाठी वणवण भटकावे लागते. "आम्हा चोयांची बाई" या कथेतील काळीला पोट भरण्यासाठी शरीरविक्रय करावा लागतो. समाजातील लोकांना दारिद्र्यामुळे नको ते व्यवसाय करण्याची कशी पाळी येते याचे प्रत्ययकारी चित्रण हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यात केलेले आहे.

हमीद दलवाईंनी आपली "इंधन" ही कादंबरी स्वातंत्र्योत्तर काल-खंडातील समाजजीवनावर लिहिली असल्यामुळे त्यांच्या कादंबरीतून बदललेल्या खेड्याचे व समाजजीवनाचे काही चित्रण पहावयास मिळतात. पंधरा वर्षांनी गावी आलेल्या निवेदकाला पहिल्या प्रथम गावातील रस्ते व इमारती यांच्यामध्ये बदल झालेला दिसून येतो. त्याचबरोबर समाजातील जाति-व्यवस्थेची बंधने ही पहिल्यापेक्षा शिथिल झालेली असतात.

तिसऱ्या प्रकरणामध्ये हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील व्यक्ति-रेखांचा विचार केलेला आहे. दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यात समाज जीवनाला जेवढे महत्त्व दिले आहे तेवढेच महत्त्व व्यक्ती या घटकाला दिलेले आहे.

"इंधन" या कादंबरीतील निवेदक ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. तो संवेदनाशील मनाचा असून दुस-याच्या वैगुण्याबरोबरच स्वतःच्या वैगुण्यावर बोट ठेवतो. गावातील संघर्षाकडे तो अलिप्तपणे पहातो. आजारी अवस्थेत विश्रांती घेण्यासाठी गावी आलेला निवेदक गावातील संघर्षानंतर पून्हा मुंबईला निघून जातो. निवेदकाचा भाऊ हट्टी आहे. कुळवाड्याबरोबरच्या भांडणात त्यांना माफी मागायला लावतो. रागाच्या वेळी भांडण करतो. राग शांत झाल्यावर त्याला मुद्दामहून बोलवतो. असा हा प्रेमळ भाऊ गावातील सुमतीबरोबर संबंध ठेऊन असतो. निवेदकाच्या कुटुंबातील भावी समजूतदार, प्रेमळ आहे. ब-याच वर्षांनी आजारी अवस्थेत गावी आलेल्या दिराची ती काळजी घेते. ती घरातील सर्व कामे आनंदाने करते. समजूतदार भावी आपल्या नव-याचे सुमतीबरोबर प्रेमसंबंध आहेत हे माहित असूनही ते निमूटपणे सहन करते. सुमती ही व्यक्तिरेखा निवेदकाच्या भावाच्या अत्याचाराला बळी पडलेली आहे. सुमतीच्या व्यक्तिचित्रणातून दलवाईनी आपल्या समाजातील स्त्रियांना आपली कोणतीही चूक नसतानाही समाजाचा अत्याचाराला कसे बळी पडावे लागते हे वास्तव स्वरूपात मांडले आहे. खोत परंपरेचा व धर्मांचा पगडा असलेला इसाक आपल्या मनाप्रमाणे वागतो. समाजाचे कोणत्याही प्रकारचे दडपण न घेता बौध्द समाजातील लक्ष्मीबरोबर संबंध ठेवतो व गावातील संघर्षाला कारणीभूत ठरतो.

हमीद दलवाई समाजातील विविध स्वभावाच्या व्यक्तिरेखा आपल्या कथात्मक साहित्यात चित्रित करतात. वडील, हरबाराव, उबेदुल्ला आणि बानो या व्यक्तिरेखा समजुतदार आहेत. त्यांच्या स्वभावामध्ये आक्रस्ताळ-पणा नाही. ऐकावे जनाचे करावे मनाचे या उक्तीप्रमाणे त्या वागतात. रसूल, हमीद, मेघा या व्यक्तिरेखा दारिद्र्यात जीवन जगतात. दारिद्र्याने त्यांचा स्वाभिमान हिरावून नेलेला आहे. परटीण, लक्ष्मी या स्त्रियांना परिस्थितीमुळे शरीरविक्रय करावा लागतो. समाज काय म्हणेल याचा

विचार न करता आपल्या वाट्याला आलेले जीवन त्या निमूटपणे जगतात. जनार्दन, हसनखान, रहीमखान व कासमखान या व्यक्तिरेखा श्रध्दाळू आहेत. अशिक्षित असणाऱ्या या व्यक्तींच्यावर परंपरेचा पगडा आहे. वाणी व वाण्याची बायको वाणिण, दिलावर या व्यक्तींच्या स्वभावामध्ये विक्षिप्तपणा व तऱ्हेवाईकपणा आहे. अनेकविध स्वभावाच्या व्यक्तिचित्रणामुळे दलवाईंच्या व्यक्तिचित्रणामध्ये विविधता आली आहे. या सर्व व्यक्तिचित्रणात दलवाई व्यक्तींच्या गुणाबरोबरच दुर्गुणाचेही चित्रण करतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखा जिवंत हाडामासाच्या व्यक्तीसारख्या वाटतात.

प्रकरण चार मध्ये हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्याचे अन्य विशेष पाहिले आहेत. हमीद दलवाईंनी वाङ्मयीन भूमिकेशी प्रामाणिक राहून कथात्मक साहित्य लिहिले असल्यामुळे त्यांचे कथात्मक साहित्य संख्यात्मक दृष्टया कमी असूनही गुणात्मक दृष्टया श्रेष्ठ दर्जाचे झाले आहे.

हमीद दलवाईंचे कथात्मक साहित्य अभ्यासल्यानंतर त्यांच्या कथात्मक साहित्यातील कथानक रचनेची काही वैशिष्टये आपणाला जाणवतात. त्यांनी कथात्मक साहित्य लिहित असताना फडके, खांडेकर प्रणित तंत्राचा वापर केलेला नाही, वास्तव पातळीवर जशा प्रकारचे समाजजीवन आहे तशा प्रकारचे समाजजीवन ते आपल्या कथात्मक साहित्यात रेखाटतात. "इंधन" या कादंबरीचा शेवट तर मराठीतील इतर कादंबरीपेक्षा वेगळ्या प्रकारचा आहे. या प्रकरणात भविष्यातील गावातील कथा सांगितली आहे आणि हे भविष्य वास्तवाइतकेच खरे वाटावे असे आहे.

हमीद दलवाई कथात्मक साहित्यात समाजजीवन व व्यक्तिचित्रण रेखाटत असताना कोणत्याही गटांची वा व्यक्तींची बाजू घेत नाहीत. ते पूर्वग्रहविरहित दृष्टिकोणातून समाजजीवनाकडे पहातात. आपली मते ते व्यक्तींच्यावर

लादत नाहीत. व्यक्तींच्या हातून घडणाऱ्या कृती व्यक्तींच्या स्वभावधर्माशी सुसंगत अशा वाटतात.

हमीद दलवाईंनी कथात्मक साहित्यात भाषेचा योग्य वापर केलेला आहे. कथात्मक साहित्यातील बऱ्याच व्यक्तिरेखा कोकणातील मुसलमान समाजातील आहेत. त्यामुळे त्यांनी कथात्मक साहित्यात कोकणी मुसलमानी भाषेचा वापर केलेला आहे. व्यक्तींच्या तोंडच्या भाषेतून दलवाई त्या व्यक्तीचा स्वभावाचे दर्शन घडवितात.

हमीद दलवाईंनी कथात्मक साहित्यातील निवेदन प्रमाण भाषेत केले असून काही ठिकाणी एखादा वर्ण्यविषय समजण्यासाठी कोकणी मुसलमानी भाषेतील शब्द वापरले आहेत. कथात्मक साहित्यातील निवेदनातून त्यांची सूक्ष्म निरीक्षण दृष्टी जाणवते. निवेदनातून त्यांनी व्यक्तिचित्रण, समूहचित्रे व निसर्गवर्णने सर्व बारकाव्यासह रेखाटलेली आहेत. त्यामुळे ती अधिक जिवंत व बोलकी वाटतात.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील संवाद बोलीभाषेत आहेत. ते सर्व संवाद अकृत्रिम, स्वाभाविक असे वाटतात. दलवाई संवादातून विविध प्रकारच्या व्यक्ती डोळ्यासमोर उभ्या करतात.

एकंदरीत हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातून सामाजिक जीवनव्यवहाराचे, मानवी स्वभावाचे तसेच त्यांची पात्रे कोकणातील ज्या परिसरात जीवन जगतात तेथील प्रादेशिकतेचे अशी अनेकविध वैशिष्ट्ये उत्तम रीतीने प्रत्ययाला येतात. कथात्मक साहित्याला अनुरूप अशा प्रकारच्या भाषेचा उपयोग करण्याचे सामर्थ्यही हमीद दलवाईंच्या ठिकाणी आहे. या अनेकविध गुणवैशिष्ट्यांमुळे हमीद दलवाईंचे कथात्मक साहित्य चांगल्या दर्जाचे झाले आहे असे आपण निर्विवादपणे म्हणू शकतो.

## साधन ग्रंथ सूची


१) कुलकर्णी द.भि. : तिस-यांदा रणांगण, विजय, नागपूर, आवृत्ती पहिली, १९७६.

२) कोतापल्ले नागनाथ : "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, १९८५.

३) दलवाई हमीद : "इंधन", मौज प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९८१.

४) दलवाई हमीद : लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी, १९९०.

५) पाटील म.सु. : "अक्षरवाटा", अनमोल, पुणे, आवृत्ती पहिली, १९८२.

६) पाध्ये प्रभाकर : "आस्वाद" मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, आवृत्ती पहिली.

७) भोसले द.ता. : ग्रामीण साहित्य: एक चिंतन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, १९८८.

८) माडगूळकर अंबादास, खांडेकर सूर्यकांत : "ग्रामीण मराठी कथा" लेखन वाचन भांडार, लेखन वाचन भांडार, पुणे, आवृत्ती दुसरी, १९७९.

९) यादव आनंद : "ग्रामीण साहित्य आणि वास्तव", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती दुसरी, १९८९.

नियतकालिके

१) "आलोचना" : मुंबई, ऑगष्ट, १९८३.

२) महाराष्ट्र साहित्य पत्रिका : ग्रामीण साहित्य विशेषांक, पुणे, जुलै ते डिसेंबर, १९८०.

३) प्रतिष्ठान : औरंगाबाद, नोव्हेंबर, डिसेंबर १९६४.

४) सकाळ : रविवार पुरवणी, पुणे, आवृत्ती १ ऑगष्ट १९८१.

.......